अतारांकित यादी क्रमांक ९

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील सुमारे २४ लाख शिधापत्रिका धारकांना विलंबाने धान्य पुरवठा झाल्याबाबत

(१) २१३ (३०-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २४ लाख शिधापत्रिकाधारकांना धान्य विलंबाने मिळाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये विशेषत: पिंपरी-चिंचवड (जि.पुणे),वाशिम,नागपूर,आर्णी (जि.यवतमाळ), मुंबई शहर आणि उपनगरातील अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना गेले अनेक महिने साखर वितरित केली नसल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अंत्योदय अन्न योजनेतील ३०% लाभार्थ्यांना Maha DBT द्वारे धान्य खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाते, हे ही खरे आहे काय, असल्यास, या योजनेतील लाभार्थ्यांना गेल्या ३ वर्षांपासून धान्य खरेदीसाठी Maha DBT योजनेअंतर्गत अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे नागपूर जिल्ह्यातील काटोल तहसील कार्यालय येथील अन्न, नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभागांतर्गत तालुक्यातील शिधापत्रिकाधारक अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य गट योजनेच्या नवीन लाभार्थ्यांना धान्याचा लाभ मिळण्याच्यादृष्टीने इष्टांग वाढविण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने इष्टांग वाढविण्याबाबत तसेच उक्त अनु.क्र.१ ते ४ प्रकरणी राज्यातील शिधापत्रिकाधारकांना व अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना धान्य वेळेत मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (२५-०८-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

विभागातील RCMS व AePDS व इतर प्रणालींचे केंद्र शासनाच्या NIC क्लाउडवर स्थलांतरीत (Cloud Migration) करण्याची प्रक्रिया माहे, डिसेंबर, २०२४ मध्ये सुरु असल्याने ई-पॉस मशिनद्वारे अन्नधान्य वितरणास व शिधापत्रिकासंबंधित ऑनलाईन कामकाज करतांना तांत्रिक अडचणी आल्या. तसेच, केंद्र शासनाच्या आधार प्रणालीमध्ये देशपातळीवर तांत्रिक समस्या असल्याने लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करतांना अडचणी आल्या.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा याजनेअंतर्गत अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना जानेवारी, २०२३ पासून केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे मोफत अन्नधान्य वितरीत करण्यात येत आहे. प्रस्तुत बाबीकरिता Maha DBT मार्फत अनुदान वितरीत करण्यात येत नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील काटोल तहसील कार्यालयास इष्टांक मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन दरम्यानच्या कालावधीत प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर यांनी दिनांक६.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये नागपूर जिल्ह्यासाठी अंत्योदय अन्न योजनेसाठी २६००० शिधापत्रिका व प्राधान्य कुटुंब योजनेसाठी ४५०० लाभार्थी इष्टांक वाढवून देण्याबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे.

(५) सद्य:स्थितीत सन्माननीय लोकप्रतिनिधी, तसेच क्षेत्रीय पुरवठा यंत्रणांकडून इष्टांक देण्याबाबत होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने, केंद्र शासनाने मंजूर केलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत, संपूर्ण राज्यासाठी देण्यात आलेल्या इष्टांकाचा आढावा घेऊन, पात्र व उचित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी दिनांक०१.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत इष्टांक वितरीत करण्यात आला आहे. त्यामध्ये नागपूर ग्रामिण जिल्हयासाठी अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांसाठी (AAY) ८२,१०३ इतका शिधापत्रिका इष्टांक व प्राधान्य कुटुंब योजनेतील (PHH) लाभार्थ्यांसाठी १५,२२,४२७ इतका लाभार्थी इष्टांक मंजूर करण्यात आला आहे. तसेच काटोल तालुक्यास अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांसाठी (AAY) ८,९२९ इतका शिधापत्रिका इष्टांक व प्राधान्य कुटुंब योजनेतील (PHH) लाभार्थ्यांसाठी १,०३,८६९ इतका लाभार्थी इष्टांक मंजूर करण्यात आला आहे.

तसेच, विभागातील प्रणालींचे Cloud Migration ची प्रक्रिया पूर्ण झाली असून तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ मध्ये सरासरी ९२% अन्नधान्याचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात आले आहे.

अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांना साखर वेळेत वाटप करण्याच्या अनुषंगाने माहे मार्च, २०२५ ते जून, २०२५ या कालावधीसाठी जिल्हानिहाय आवश्यक साखरेची मागणी प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर तात्काळ साखर खरेदीची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

येवला (जि.नाशिक) तालुक्यातील डोंगरी क्षेत्रातील गावाच्या नावात चूक झाल्यामुळे शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत

(२) २२७ (२८-०४-२०२५). : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यात डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत सुधारीत निकाषांनुसार निश्चित केलेल्या डोंगरी क्षेत्रातील दिनांक १३ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयात नायगव्हाण ऐवजी नायगाव अशी चूक झाल्यामुळे शासन निर्णयात या गावाची सुधारणा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास अप्पर मुख्य सचिव,नियोजन विभाग यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अजित पवार (१४-०७-२०२५) : (१) होय.

(२) शासन निर्णय, दिनांक१३ मार्च, २०२४ अन्वये डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत नमूद करण्यात आलेल्या सर्व डोंगरी उपगट तालुक्यातील गावांच्या नावात काही तांत्रिक बाबी किंवा नामसाधर्म्यामुळे बदल किंवा दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या निर्णयार्थ सादर करण्यांत आला आहे. सदर प्रस्तावात वरील (१) येथे नमूद निवेदनातील गावाचा सुध्दा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

येवला (जि.नाशिक) तालुक्यातील तीन रेल्वे क्रॉसिंगवर वाहतूक कोंडीचा त्रास कमी होण्यासाठी उड्डाणपूल बांधण्याबाबत

(३) २३२ (२४-०४-२०२५) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील तीन रेल्वे क्रॉसिंगवर वाहतूक कोंडीचा त्रास कमी होण्यासाठी उड्डाण पूल बांधण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२४ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०४-०६-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ७४, ७६ व ७७ या तीनही रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला आहे. तसेच प्रकल्पाच्या संयुक्तिक तपासणी व व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ येवला येथील शाखा अभियंता यांची दिनांक२४.११.२२ रोजी नेमणूक करण्यात आली असून त्याप्रमाणे सहायक मंडळ इंजिनियर, मध्य रेल्वे, अहिल्यानगर यांना कळविण्यात आले आहे. तसेच प्रकल्पाच्या संयुक्त तपासणी व व्यवहार्यता अभ्यास करणास्तव मंडळ, इंजिनियर, मध्य रेल्वे, अहिल्यानगर यांचे समवेत कार्यवाही प्रगतीत आहे.

सबब, सदर ठिकाणी उड्डाण पुलाचे बांधकाम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

मुंबईतील विधानभवन ते मंत्रालय पर्यंत भूमिगत पदचारी मार्ग करण्याबाबत

(४) ६४३ (२७-०४-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विधानभवन मेट्रो स्थानकांपासून मंत्रालयासाठी भूमिगत पादचारी मार्ग करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गासाठी किती खर्च करण्यात आला आहे, तसेच सदर पादचारी मार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-०९-२०२५) : (१) व (२) मुंबईतील विधानभवन मेट्रो स्थानकापासून मंत्रालयासाठी भूमिगत पादचारी मार्गाचे काम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.मुंबई यांचेमार्फत करण्यात येत आहे.सदर कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रू.२९.६८कोटी इतका निधी मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.मुंबई यांना वर्ग करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमएआरडीए) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम करण्याबाबत

(५) ६७० (२७-०४-२०२५). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमएआरडीए) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या व दुस-या टप्प्यासाठी किती खर्च येणार असुन काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२५) : १) होय,हे खरे आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे काम दिनांक २५.१२.२०२४ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे.
२) तंत्रज्ञानच्या कामाची अंमलबजावणी अंदाजे माहे, डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
३) सदर प्रकल्पाच्या दोन्ही टप्प्याकरीता एकूण रु ४०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे

नांदेड येथील बॉम्ब शोधक व नाशक पथक कार्यालय ते भगवान बाबा चौक पर्यंतच्या रस्त्याची झालेली दूरवस्था

(६) ७४० (२४-०५-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरातील बॉम्ब शोधक व नाशक पथक कार्यालय ते भगवान बाबा रोड मार्गावर कल्पतरु व जैन कॉलनी हा परिसर असून तेथे जवळपास दीड ते दोन हजार लोकवस्ती आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात शासनाची सर्वप्रमुख कार्यालय असून न्यायालयाचे इमारती बांधकाम देखील चालू आहे, परंतु बॉम्ब शोधक व नाशक पथक कार्यालय ते भगवान बाबा चौक पर्यंतच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे दिनांक१३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तेथील नागरिकांनी महानगरपालिकेत अनेकदा विनंती करुन व प्रत्यक्ष अधिकाऱ्यांशी भेटूनही अद्याप कोणती कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर भागातील रस्ता दुरुस्तीबाबत महानगरपालिकेने वा शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर रस्ता पावसाळ्याच्या दिवसात खराब होतो. नांदेड महानगरपालिकेने सर्वसाधारण ठराव घेऊन सदर रस्ता सार्वजनिका बांधकाम विभाग, नांदेड यांच्याकडे हस्तांतरीत करण्यासाठी मान्यता प्रदान केली होती. परंतु सदरील रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी हस्तांतर करुन घेतला नाही. त्यामुळे रस्ता दुरुस्तीबाबत वेळेत कार्यवाही होऊ शकली नाही.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर रस्ता विकास योजनेतील योजनेतील नसून शिव रस्ता (Village Boundary Road) आहे. स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत रस्त्यावर चुरी, मुरुम टाकूण रस्ता पावसाळयाच्या दिवसात वेळोवेळी दुरुस्त करण्यात येतो.

(४) सदर रस्त्याच्या कामासाठी अंदाजित खर्च रु.१०.०० कोटी अपेक्षित आहे. महानगरपालिकेतर्फे स्थानिक लोकप्रतिनिधीच्या ही बाब निदर्शनास आणून सदर रस्त्याचे कामासाठी स्थानिक विकास निधीमधून निधी मिळण्याची विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोकण भवन या कार्यालयात असलेल्या शासकीय वसाहतीमधील
९८ सुरक्षा रक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

(७) १०७२ (२५-०४-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पनवेल, नवी मुंबई, कोकण भवन कार्यालयात असलेल्या शासकीय वसाहतीमधील ९८ सुरक्षा रक्षकांचे वेतन ६ महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुरक्षा रक्षकांना वेतन न मिळाल्याने त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार युनियनने सार्वजनिक बांधकाम मंत्री व बांधकाम विभागाकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार सदर सुरक्षारक्षांचे वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२५-०७-२०२५) : (१), (२), (३) व (४) कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., पनवेल या कार्यालयांतर्गत ९८ कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या पारिश्रमिकाची प्रलंबित रू.२८६.०५ लक्ष च्या देयकांपैकी सन २०२४-२५ या अर्थसंकल्पीय वर्षात रू.२१२.६४ लक्षची देयके अदा करण्यात आली आहेत. उर्वरीत रू.७३.४१ लक्षची प्रलंबित देयके चालु वर्षाच्या अर्थसंकल्पीत तरतुदीतून अदा करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दक्षिण मुंबईतील मलबार हिल विभागात जुन्या इमारतींचा पुनर्विकास , वाहतूक कोंडी,
वाहनतळ याबाबत प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

(८) १०७६ (०१-०५-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील उच्चभ्रू परिसर म्हणून मलबार हिल विभाग ओळखला जात असून या विभागात जुन्या इमारतींचा पुनर्विकास , वाहतूक कोंडी, वाहनतळ असे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागात अनेक नागरी समस्या असून त्या समस्यांचे निवारण आजमितीस झालेले नसल्याने तेथील रहिवाश्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मलबार हिल सारख्या विभागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०२५) : (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.

डी विभागाच्या वतीने नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सांडपाणी व्यवस्था, लघु आकाराच्या पर्जन्य जलवाहिन्या सुस्थितीत ठेवणे, मलनिःसारण, किटकनाशक फवारणी, रोगराई नियंत्रण, रस्ते, पदपथ व गटारे सुस्थितीत ठेवणे विविध परवाने व नाहरकत प्रमाणपत्र वितरीत करणे अशा विविध नागरी सुविधा पुरविण्यात येत असुन नागरीकांकडुन प्राप्त तक्रारीचे विहित मुदतीत निराकरण करण्यात येते.

(३) मुंबई महानगरपालिकेने वाहनतळ बांधकाम व जुन्या इमारतींचा पुनर्विकासाचा प्रस्ताव मंजूर करण्याकरीता संगणकीय प्रणाली विकसीत केलेली असून विकासकाने सदर प्रणालीमध्ये वास्तुविशारदामार्फत अर्ज करुन परवानगी प्राप्त करण्याची तरतुद आहे. त्यामुळे वाहनतळ बांधकाम व जुन्या इमारतींचा पुनर्विकासाच्या प्रस्तावास संगणकीय प्रणालीद्वारे व्यावसाय सुलभता अर्थात इज ऑफ डुईंग बिजनेस (EODB) धोरणानुसार मंजुर केले जातात.

तसेच, मलबार हिल विभागामध्ये नगर भूकर क्रमांक १A/६६४ येथे २०४ वाहनांकरिता वाहनतळ बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे व सदर वाहनतळ दिनांक११.०१.२०१६ रोजी विकासक मे. लोढा डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे. तसेच, नगर भूकर क्रमांक २३३ येथे ५७ वाहनांकरिता वाहनतळ बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे व सदर वाहनतळ दिनांक११.०५.२०१८ रोजी विकासक मे. रुणवाल डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे.

तसेच, संगणकीय प्रणालीमध्ये सद्यस्थितीत वाहनतळ बांधकाम व जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबतचा कोणताही प्रस्ताव प्रलंबित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी (पूर्व) येथील आरे दुग्धवसाहत येथील शासकीय दवाखाना सुरु करण्याबाबत

(९) १२२० (०१-०५-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (पूर्व) येथील आरे दुग्धवसाहत येथील शासकीय दवाखाना सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधिंनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरेगांव (मुंबई) येथील आरे वसाहतीत गोर-गरीब आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात असून प्राथमिक आरोग्य उपचारांचा अभाव, रुग्णशल्यांची तुटपुंजी अवस्था डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती अशा अनेक समस्यांमुळे रुगणालय बंद अवस्थेत असल्याचे महानगरपालिकेच्या बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा सेंटर मध्ये रुग्णांना उपचारासाठी जावे लागत असल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२४ व त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालय आरे प्रशासन चालविण्यास असमर्थ असल्यामुळे ते बृहमुंबई महानगरपालिकेला चालविण्यास देण्यात यावी अशी मागणी नागरीकांनी केली असून आरे प्रशासनाने यांस नकार दिला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालय असलेली जागा दवाखान्याकरिता आरक्षित असल्याने ती जागा महानगरपालिकेला हस्तांतरित केल्यास महानगरपालिका सेवा पुरविण्यास तयार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रुग्णालय खासगी संस्थेस चालविण्यास न देता आरक्षण रुग्णालयाचे असल्यामुळे सदर जागा सार्वजनिक आरोग्याचा विचार करून महानगरपालिकेला हस्तातंरित करण्याचे आदेश देऊन सदर दवाखाना त्वरित सुरु करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/दक्षिण विभागातील पहाडी आरोग्य केंद्राद्वारे तसेच आरे मोबाईल व्हॅन द्वारा फिरता HBT दवाखाना अंतर्गत आरे कॉलनीच्या परिसरात प्राथमिक आरोग्य उपचार व प्रतिबंधात्मक वैद्यकीय सुविधा दिल्या जातात.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) शासन निर्णय दि ११/०६/२०२५ अन्वये मौजे आरे रुग्णालयाची इमारत (क्षेत्रफळ-१२५७.९०चौ.मी) व निवासस्थान (क्षेत्रफळ-६७४.३० चौ.मी) असे एकूण (क्षेत्रफळ-१९३२.२० चौ.मी) इतकी जागा बृहन्मुंबई महानरपालिकेला ३० वर्ष कालावधीसाठी हस्तांतरीत करण्याचा निर्णय झाला आहे. सदर जागा हस्तांतरीत करण्याची व दवाखाना कार्यान्वित करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

जोगेश्वरी गुंफा परिसरात जयंत चाळीतील १८ रहिवाशी बेघर झाल्याबाबत

(१०) १२४४ (०१-०५-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी गुंफा परिसरात गेल्या ५० वर्षापासून अस्तित्वात असलेल्या जयंत चाळ सन २००४ मध्ये पुनर्वसनाकरिता निष्कासित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेतर्फे जोगेश्वरी गुंफे परिसरात झोपडयाचे सर्व्हेक्षण करण्यात आले त्यावेळी घरे अगोदरच निष्कासित केलेली असल्याने चाळीतील रहिवाशाच्या घरांचे सर्व्हेक्षण करण्यात आले नसल्याने १८ रहिवाश्यांना पात्र ठरविण्यात न आल्याने १८ रहिवाशी बेघर झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने १८ बेघर रहिवाश्यांच्या घराचे सर्वेक्षण करुन पात्र ठरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) जोगेश्वरी गुंफा परिसरातील जयंत चाळीतील १८ रहिवाश्यांच्या पुर्नवसनाचा प्रस्ताव सादर होऊन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्यामार्फत पुरातत्व स्थळाच्या १०० मिटर संरक्षित भागात येत असल्याने सदर पुनर्वसनाचे काम थांबवण्यात आले आहे. तथापि, जयंत चाळी स्थित भूखंडाचा विकास हा पुरातत्व सर्वेक्षण विभागाची ना हरकत प्रमाणपत्र व इतर बाबींची पुर्तता विकासकाकडून पूर्ण झाल्यानंतर करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती महानगरपालिकेत बाजार परवाना विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कोट्यवधींचे नुकसान होत असल्याबाबत

(११) १२७२ (०१-०५-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेत मालमत्ता करानंतर उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून अतिशय महत्त्वाचा विभाग असल्याने बाजार परवाना विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कोट्यवधींचे नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४

मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांकडून अमरावती व बडनेरा येथे आलेल्या बाजारपेठेतील होर्डिंगधारकांवर कारवाई, होर्डिंगच्या आकारानुसार दर ठरविणे इत्यादी बाबीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका आयुक्तांकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अमरावती महानगरपालिकेचे कोट्यवधींचे नुकसान होण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये सर्वसाधारण सभेच्या दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ ठराव क्र. २० नुसार जाहिरात शुल्क निश्चित करण्यात आले होते. मे. सेल ॲड्स यांना दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ या कालावधीकरीता प्रती वर्ष ८७ लक्ष दराने महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात फलक व इतर जाहिरातीबाबत वसुलीचा कंत्राट देण्यात आले होते. तथापि, दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून वस्तू व सेवा कर (G.S.T) लागू झाल्याने दिनांक१५ जानेवारी, २०१८ च्या आदेशान्वये सदर करार रद्द करण्यात आला.

त्यानंतर सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०६ दिनांक१९ जानेवारी, २०१८ अन्वये दिनांक ०१ जुलै, २०१७ ते ३१ मार्च, २०१८ या कालावधीत पुनश्चः जाहिरात शुल्क निश्चित करून होर्डींग धारकांना परवाने देण्यात आले. तथापि, सर्व जाहिरात होर्डींग धारकांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ९०/२०१८ दाखल केली. सदर याचिकेअंतर्गत मा. न्यायालयाने दिनांक १७ जुलै, २०१८ रोजीच्या आदेशान्वये प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत जाहिरात शुल्क वसुल करणेबाबत प्रतिबंध केला असल्याने महानगरपालिकेस जाहिरात धारकांकडून जाहिरात शुल्कापोटी कोणतीही रक्कम प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे आहे.
(३) मा न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून दिनांक १ जुलै, २०१७ ते ८ मे, २०२२ पर्यंतची वसूली वगळता महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्ह (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शन करणेचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ अधिसूचना लागू झाल्याच्या दिनांकापासून सर्व थकित जाहिरात धारकांचे जाहिरात शुल्क वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची महानगरपालिकास्तरावर चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील हवेची गुणवत्ता निर्देशांक मोजणारी महानगरपालिकेकडील एकमेव मोबाईल व्हॅन नादुरुस्त झाली असल्याबाबत

(१२) १३८४ (०१-०५-२०२५). श्री.संजय देरकर (वणी), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील प्रदूषणाचा आणि साथीच्या आजारांचा धोका रोखण्यासाठी हवेची गुणवत्ता मोजणारी महानगरपालिकेकडील एकमेव गुणवत्ता निर्देशांक मोबाईल व्हॅन नादुरुस्त झाली असून महानगरपालिकेकडे सक्षम यंत्रणाच नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी आणखी चार मोबाईल व्हॅन घेण्याचा प्रस्ताव पालिकेने सन २०२३ मध्ये मांडला असून त्यावर अद्यापही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील वाढता प्रदूषणाचा आणि साथीच्या आजारांचा धोका लक्षात घेऊन तातडीने प्रदुषण विरोधी मोहीम आणि कारवाई तीव्र करण्याच्या अनुषंगाने काय उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी एकूण २८ स्थायी ‘स्वयंचलित वातावरणीय वायु सर्वेक्षण केंद्र’ (CAAQMS) कार्यरत आहेत. त्यासोबतच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे मुंबई क्षेत्राकरीता ४ फिरते वायू सर्वेक्षण मोबाईल व्हॅन कार्यरत आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे वायु सर्वेक्षणासंबंधी पुरेशी सक्षम व्यवस्था आहे.

महानगरपालिकेच्या मोबाइल व्हॅन मधील PM १० व PM २.५ हे Analyzers नादुरूस्त झाल्याने ०१ डिसेंबर २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीसाठी महानगरपालिकेची मोबाईल व्हॅन मधील जुने UPS, बॅटरीसहीत बदलण्यात आले आहेत. सद्यस्थितीत महानगरपालिकेची मोबाईल व्हॅन पुर्ववत सुरू आहे.

(२) हे खरे आहे.

या कामासाठी सार्वजनिक जाहिरातीव्दारे निविदा मागविण्याच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता दिनांक३० ऑगस्ट २०२४ मध्ये मिळाली. तथापि, विधानसभा निवडणूक आचार संहिता कालावधीत निविदा प्रक्रिया राबविता आली नाही. सन २०२५-२६ मध्ये नवीन ४ मोबाईल व्हॅन खरेदीबाबतची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने ऑक्टोंबर, २०२४ ते मार्च, २०२५ पर्यंत मुंबई शहरातील वाढते वायू प्रदूषण रोखण्याच्या अनुषंगाने ४२७०२.३९ किमी लांबीचे रस्ते पाण्याने धूण्यात आले. ४४८८ बांधकाम प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस, (show cause) देण्यात आल्या आहेत. तसेच, २३८५ बांधकाम प्रकल्पांना कामे बंद (stop work) करण्याकरिता नोटीस दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मिठ चौकी मालाड (पश्चिम) या ठिकाणी उड्डाणपुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

(१३) १४२६ (०१-०५-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिठ चौकी मालाड (पश्चिम) या ठिकाणी उड्डाण पुलाचे काम संथगतीने सुरु असून निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उड्डाण पूलाचे काम अपूर्ण असल्याने मिठ चौकी, लिंक रोड व मार्वे रोड वर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उड्डाण पूलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच निकृष्ट दर्जाचे काम झाल्यासंदर्भात संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

मिठ चौकी मालाड (पश्चिम) या ठिकाणी उड्डाणपुलाचे काम हे पूर्ण झाले असून सदर पुलाचा एक भाग (उड्डाणपूल ‘अ’) दिनांक ०६.१०.२०२४ रोजी आणि दुसरा भाग (उड्डाणपूल ‘ब’) दिनांक ११.०१.२०२५ रोजी वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. सदर पुलाचे काम हे महानगरपालिका नियुक्त तांत्रिक सल्लागाराच्या आराखड्या प्रमाणे व वाहतूक पोलीस विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन पूर्ण करण्यात आलेले आहे.

सदर पुलाचे काम सुरु असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेचा (दक्षता) विभागामार्फत वेळोवेळी पाहणी देखील करण्यात आलेली आहे. सदर उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्यांची तपासणी निविदेतील अटी व शर्तीनुसार नियमीत प्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत करण्यात आलेली आहे. तसेच, सदर

कामातील उड्डाणपूल अ आणि ब चे काम तयार केलेल्या संरचनात्मक आराखड्यानुसार झाल्या संबंधीचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) तांत्रिक सल्लागार मे.टेक्नोजेम कन्सलटंट प्रा.लि. यांनी सादर केले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मिठ चौकी जंक्शन हे अती वर्दळीचे ठिकाण असून मार्वे रोड हा पश्चिमेकडील मालवणी, - मढ, आक्सा गांव, गायकवाड नगर, इत्यादी दाट लोकसंख्या असलेल्या वसाहतीला जोडणारा एकमेव रस्ता आहे. मिठ चौकी जंक्शन येथे उड्डाणपुलाचे काम सुरु असताना ९.० मीटर रुंदीचे बैरीकेडींग करण्यात आले होते. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होत होती. तथापि, सदर पुलाचा एक भाग (उड्डाणपूल 'अ') दिनांक ०६.१०.२०२४ रोजी आणि दुसरा भाग (उड्डाणपूल 'ब') दिनांक ११.०१.२०२५ रोजी वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. सदरहू पुलामुळे मीठ चौकी जंक्शन येथील वाहतूक कोंडी कमी झालेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण (MMRDA) ने गायमुख ते फाऊंटन (जि.ठाणे) या प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत

(१४) १४३२ (०१-०५-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गायमुख ते फाऊंटन (जि.ठाणे) या रस्त्यास प्रशासकीय मान्यता दिनांक ३० जुलै,२०२४ रोजी वा त्यासुमारास देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण (MMRDA) ने या रस्त्याच्या निविदा प्रक्रिया पूर्ण केली असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२४ च्या पहिल्या आठवडयात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पाचे काम सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२५) : (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) एमएमआरडीएमार्फत घोडबंदर येथील वाहतुक कोंडी विचारात घेऊन गायमुख ते भाईंदर पर्यंत भुयारी व उन्नत मार्ग उभारण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. यामध्ये गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन असा ५.७० कि.मी. चा भुयारी मार्ग व फाऊंटन हॉटेल जंक्शन ते भाईंदर असा ९.८० कि.मी चा उन्नत मार्ग उभारण्यात येणार आहे. सदरहू मार्ग उभारण्यासाठी प्राधिकरणामार्फत २७.०७.२०२४ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. याकरीता पाच कंपन्यानी आपल्या निविदा सादर केल्या होत्या.

सदर निविदेमध्ये छाननी समितीच्या शिफारशीनुसार तीन निविदा धारकांना तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरविण्यात आले व उर्वरित दोन निविदाकारांना तांत्रिक छाननीमध्ये अपात्र ठरविण्यात आले, त्यामध्ये एल अँड टी या कंपनीचा समावेश होता. या अपात्र केल्याचे विरुध्द एल अँड टी कंपनीने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाने प्राधिकरणाने एल अँड टी कंपनीस पुर्व सूचना न देता अपात्रतेबाबत केलेली कार्यवाही योग्य असल्याचा निर्णय देऊन एल अँड टी ची याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे पात्र निविदा धारकांचे आर्थिक देकार उघडण्यात आले. त्यानुसार मेघा इंजिनिअरींग इन्फ्रास्ट्रचर लि. यांनी गायमुख ते फाऊंटन हॉटेल या भुयारी मार्गाच्या कामासाठी रु. ९०१९.५३ कोटी व फाऊंटन हॉटेल जंक्शन ते भाईंदर या उन्नत मार्गाच्या कामासाठी रु. ६१६३.३४ कोटी न्युनतम दराची निविदा दाखल असल्यामुळे या कंपनीची निविदा मान्य करण्यात आली.

एल अँड टी कंपनीने सदर निविदा प्रक्रियेमध्ये त्यांच्या कंपनीमार्फत दाखल केलेली निविदा ही प्राधिकरणाने मान्य केलेल्या मे. मेघा इंजिनिअरींग कंपनीपेक्षा न्युनतम दराची असल्याचे नमूद करुन मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक

२०.०५.२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यास अनुसरुन मा. सर्वोच्च न्यायालयात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने व्यापक जनहित विचारात घेऊन अवलंबिण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेत असल्याचा प्रस्ताव मा. सर्वोच्च न्यायालया समोर ठेवल्याने मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ३०.०५.२०२५रोजी आदेशाद्वारे याचिका निष्फळ ठरवून फेटाळण्यात आली आहे. आता सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता फेर निविदा प्रसिध्द करण्याचे प्राधिकरणाचे नियोजन आहे.

अकोला महानगरपालिकेने वार्षिक भाडे तत्वावर असलेल्या भाडेकरुंच्या भाडयात अवाजवी दरवाढ केल्याबाबत.

(१५) १५०९ (०१-०५-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेने वार्षिक भाडे तत्वावर असलेल्या भाडेकरुचे वार्षिक भाडे ५००० रुपयांवरुन थेट १,१०,०००/- रुपयांपर्यत वाढविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास भाडेवाढ रदद केल्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने प्रशासनाकडून अदयापी १० टक्के दराने भाडेपट्टी वसुलीची कारवाई सुरु आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, अकोलाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी १ टक्के दराने भाडेपटटी घ्यावी अशी मागणी केली आहे हे खरे आहे काय, असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२, दिनांक १२.०७.२०१८ अन्वये निवासी वापराकरिता असलेल्या दुकान/प्लॉट यावर शिघ्र सिध्द गणकाच्या २% दराने व वाणिज्य वापराकरिता असलेल्या दुकाने / प्लॉट यांना १०% दराने भाडे आकारणी करण्याबाबत मान्यता प्रदान झाली आहे. त्यानुसार वार्षिक भाडेपट्टयावरील गाळे धारकांकडून भाडे आकारणी करण्यात येत होती.

तद्नंतर मालमत्ता मुल्यांकनाच्या ८% रक्कम किंवा बाजार भावानुसार निश्चित होणारे वार्षिक भाडे यापैकी जे जास्त असेल तेवढे वार्षिक भाडे समितीमार्फत निश्चित करण्याबाबत दिनांक १३.०९.२०१९ रोजी शासन अधिसूचना निर्गमित करण्यात आली होती. तथापि, सदर अधिसूचनेला दिनांक ०६.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये नवीन दराने भाडेपट्टा निश्चितीकरण करण्याबाबत निर्णय होवून सुधारीत आदेश काढले जात नाही तेव्हापर्यंत स्थगिती देण्यात आली.

तद्नंतर दिनांक ०६.११.२०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टाव्दारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नुतनीकरण) नियम २०२३ प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर अधिसूचनेमध्ये दिनांक १३.०९.२०१९ रोजी निर्गमित अधिसूचनेपूर्वी जो दर संबंधीत महानगरपालिकेमध्ये प्रचलित होता त्या भाडेपट्टा दरामध्ये होणारी वाढ एकाच वेळी दुप्पट प्रमाणापेक्षा जास्त होणार नाही असे नमुद केलेले आहे. त्यानुषंगाने मा. सर्वसाधारण सभेच्या दिनांक १२.०७.२०१८ रोजीच्या ठराव क्र.१२ नुसार निश्चित करण्यात आलेल्या भाडेपट्टा दरानुसार संबंधितांकडून भाडे वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) सदर विषयाबाबत अकोल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून अकोला महानगरपालिकेस कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील रस्त्यांवर वाढलेल्या अतिक्रमणाबाबत

(१६) १६१३ (०१-०५-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात १२ मीटर आणि त्यापुढील रस्त्यांचा करोडो रुपये खर्च करून विकास करण्यात आला परंतु रस्त्यांवरील बेकायदा बांधकामे आणि फेरीवाल्यांनी रस्त्यावरील फूटपाथवर केलेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास , शहरात रहदारीसाठी फुटपाथ मुक्त करण्यासाठी तसेच फेरीवाले, फळविक्रेते यांचे योग्य जागेत पुनर्वसन करण्यासाठी टी.व्ही.सी (टाउन वेंडिंग कमिटी) स्थापन होऊन सुद्धा प्रभावीपणे अमंलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाल, इतवारी परिसरातील रस्त्यालगतची बेकायदा बांधकामे निष्कासीत करणे आणि हॉकर्स झोन निश्चित करणेकामी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मनपाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांना रहदारीसाठी रस्ता उपलब्ध होण्याकरिता अतिक्रमण निष्कासीत, अपघातांची संख्या कमी करणे, अनधिकृत बांधकाम निष्कासित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

नागपूर महानगरपालिकेअंतर्गत दिनांक ६ ऑक्टोंबर २०२२ च्या अधिसूचनेनुसार पथ विक्रेता समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर नगर पथ विक्रेता समितीने डिसेंबर २०२२ ते जानेवारी २०२५ दरम्यान अकरा बैठका पार पाडून पथ विक्रेत्यांबाबत विविध निर्णय बैठकांमध्ये घेण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे आहे.

दिनांक २८.०१.२०२५ रोजी आयुक्त तथा प्रशासक नागपूर महानगरपालिका यांच्याकडे झालेल्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी महाल परिसरातील पथ-विक्रेत्यांकरिता पथविक्रेता प्रक्षेत्र निर्माण करण्याचे सुचित केले होते.

(४) नागरिकांना रहदारीसाठी रस्ता उपलब्ध होण्याकरिता अतिक्रमण निष्कासीत करणे, अपघातांची संख्या कमी करणे, अनधिकृत बांधकाम निष्कासित करणे याबाबत महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाव्दारे नियमित कार्यवाही करण्यात येत असून यापूर्वी ११३ नोंदणीकृत हॉकर्स व्यतिरिक्त इतर अनधिकृत हॉकर्स व अतिक्रमणकर्ते यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांच्यावर जप्ती व दंड वसूलीची कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

बोरिवली येथील माता बालक रुग्णालय ते जय महाराष्ट्र नगर
रोड नं.३ हा रस्ता अनेक वर्ष बंद असल्याबाबत

(१७) १७९६ (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली येथील माता बालक रुग्णालय ते जय महाराष्ट्र नगर रोड नं.३ तसेच गार्डन फॅक्टरी ते पश्चिम द्रुतगती महामार्ग हा रस्ता गेल्या कित्येक वर्षे विकासकांपासून आणि नागरिकांच्या वापरासाठी बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता बंद असल्याने नागरिकांना सिध्दार्थ नगर मार्गाने पूर्ण वळसा घेऊन जावे लागत असल्याने वेळ, पैसा व इंधन वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरील मार्ग पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१), (२) व (३) बोरीवली (पू) येथील माता बालक रुग्णालय ते जय महाराष्ट्र नगर रोड नं.३ हा रस्ता १३.४० मी. रुंद प्रस्तावित विकास नियोजन रस्ता असून विकास नियोजन आराखडा २०३४ चा भाग आहे व सदर आरक्षण हे २०३४ पर्यंत अस्तित्वात येणे हा विकास नियोजन आराखडा अंमलबजावणीचा भाग आहे. सद्यस्थितीत, सदर रस्ता खाजगी जागेतून जात असल्याने व सदर भूभाग महापालिकेस हस्तांतरण न झाल्याने रस्ता विकसित झालेला नाही.

तसेच, गार्डन फॅक्टरी ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारा रस्ता हा विकास नियोजन आराखडा २०३४ मध्ये १८.३० मीटर रुंद विकास नियोजन रस्ता म्हणून दर्शविला असून सदर भूभाग देखील महापालिकेस हस्तांतरण न झाल्याने रस्ता विकसित झालेला नाही.

माता बालक रुग्णालय ते जय महाराष्ट्र नगर रोड नं.३ या १३.४० मी. रुंद प्रस्तावित विकास नियोजन रस्त्याची अधिग्रहण प्रक्रिया जलदगतीने करण्याकरीता सदर रस्त्यास १३.४० मीटर रुंद नियमित रस्तारेषा विहीत करण्याची मागणी दिनांक२७.०१.२०२५ रोजी प्राप्त झाली. त्या अनुषंगाने दिनांक०५.०२.२०२५ अन्वये आर/मध्य विभाग कार्यालयास सदर रस्त्याचे Total station survey Plan देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर संबंधित विभागांस प्रस्तावित रस्ता रेषेबाबत अभिप्राय सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर रस्त्याचे Plan व इतर आवश्यक अभिप्रायानुसार नियमित रस्तारेषाविहीत करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मुंबईला वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी विकसित केलेल्या गारगाई प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१८) १७९७ (०१-०५-२०२५). श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईचा झपाट्याने होणारा औदयोगिक विकास आणि वाढणारी लोकसंख्या पार्श्वभूमीवर वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने मध्य वैतरणा प्रकल्पाच्या पुर्ततेनंतर गारगाई प्रकल्प विकसित करण्याचे काम हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईला वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेने सन २०२० मध्ये मंजुरी दिलेल्या गारगाई धरणाचा प्रस्ताव तानसा वनक्षेत्रात आणि वन्यजीव विभागाच्या परवानगीसाठी दोन वेळा शासनाकडे अर्ज दाखल करुन परवानगी मिळाली नसल्याने प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नेमलेल्या डॉ. एम ए चितळे यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार गारगाई प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक १७.०४.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत वन्यजीव प्रस्तावास मंजुरी देण्यात आली असून, राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मंजुरी प्राप्त करण्यासाठी कार्यवाही/ प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. तसेच, वन विभागाची परवानगी प्राप्त करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरू आहे.

(३) सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (CDO) नाशिक यांच्या ६ पैकी ५ विभागांमार्फत प्रकल्पाच्या आराखड्यास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच, सदर प्रकल्पामुळे बाधित होणा-या गावांच्या पुनर्वसनाबाबत ग्रामसभेचे अनुकुल ठराव प्राप्त झाले आहेत. तसेच, सदर बाबीसाठी केंद्र शासनाच्या जनजातीय मंत्रालयाची मंजुरी प्राप्त झाली आहे.

प्रकल्प निव्वळ पिण्याचे पाणी पुरवठ्याकरिता असल्याने त्यास पर्यावरण मंत्रालयाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तथापि, वन विभागाची व वन्यजीव महामंडळाची परवानगी प्राप्त करण्याकरिता अर्ज सादर केला असून राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक १७.०४.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत वन्यजीव प्रस्तावास मंजुरी देण्यात आली असून, राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मंजुरी प्राप्त करण्यासाठी कार्यवाही/प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. तसेच, सादर केलेल्या अर्जातील माहितीबाबत उपस्थित केलेल्या शंका, प्रश्न यांचे सुयोग्य पध्दतीने निरसन करण्यात येत असून पर्यायी वनीकरण्यासाठी जमीनीबाबत पाठपुरावा सुरू आहे.

पुनर्वसनाकरिता ४०० हे. जमिन देवळी गावानजिक निश्चित करण्यात आली असून, त्याबाबतचा वन वळतीकरणाचा प्रस्ताव वनविभागामार्फत सादर करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बोरिवली येथील सलीम कंपाऊड , नरसीपाडा कांदिवली पूर्व या संपूर्ण परिसरामध्ये क्रिडा सकुल उभारण्याबाबत

(१९) १८०१ (२३-०४-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली विधानसभा मतदार संघातील सलीम कंपाऊड , नरसीपाडा कांदिवली पूर्व या संपूर्ण परिसरामध्ये हा एकमेव म्हाडाचा भूखंड उपलब्ध असून या विभागामध्ये कुठेही खेळाचे मैदान उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने भव्य मैदान अथवा क्रिडा संकुल उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधित विभागाकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

या ठिकाणी महानगरपालिकेचे खेळाचे मैदान अस्तीत्वात असून त्याचे आरक्षण प्ले ग्राऊंड असे असून त्याचे क्षेत्रफळ ३८४.७ चौ.मी. इतके आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उक्त भूभाग हा म्हाडा प्राधिकरणाच्या मालकीचा असून, त्याठिकाणी क्रीडा संकुल बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर प्रस्ताव दिनांक१९.०६.२०२५ अन्वये कार्यकारी अभियंता यांना पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

हनुमान टेकडी, काजूपाडा व दहिसर पूर्व येथे नैसर्गिक तलावात डेब्रीज टाकत असल्याबाबत

(२०) १८०२ (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हनुमान टेकडी, काजूपाडा व दहिसर पूर्व (मागाठाणे प्रभाग क्र.५) येथे अज्ञातांकडून शेकडो ट्रकच्या माध्यमातून डेब्रिज आणून टाकण्यात येत असल्याने या भागातील नैसर्गिक तलाव बुजण्याच्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात डेब्रिज टाकण्याकरिता शासनाकडून परवानगी देण्यात आली आहे काय, तसेच या ठिकाणी अनधिकृतपणे बांधकामे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

न.भू क्र.२३३०/ए/१/१ २३२१/ए/१, हनुमान टेकडी, काजूपाडा येथे भरणी करण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक १६.१२.२०२२ रोजी परवानगी देण्यात आली होती. सदर परवानगी दिनांक २३.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर सदर ठिकाणी भरणीचे काम सुरू नाही.

(२) या भागात महानगर पालिकेच्या प्रचलित पद्धतीने मे.आरवी ट्रान्स्पोर्ट यांना दिनांक १६.१२.२०२२ अन्वये भरणी करण्यास परवानगी देण्यात आली होती. तथापि, परवानगीतील अटींची पूर्तता न केल्याने देण्यात आलेली परवानगी दिनांक २३.०६.२०२३ अन्वये रद्द करण्यात आली आहे.

सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील भांडुप (प) येथील श्रीरामपाडा परिसरातील पाईप लाईनवर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग निर्माण झाले असल्याबाबत.

(२१) १८२७ (०१-०५-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ईशान्य मुंबईतील भांडुप (प) येथील श्रीरामपाडा परिसरातील पाईप लाईनवर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून सगळीकडे कचऱ्याचे ढीग निर्माण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असून भविष्यात मोठी आग लागल्यास बाजूलाच असलेल्या पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईनचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कचऱ्यांचे ढिग तात्काळ हटवून पुन्हा कचऱ्याचे ढीग न पसरण्याबाबत महानगरपालिके प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील एस विभाग हा झोपडपट्टीयुक्त व दाट लोकवस्तीचा आहे. त्यातील श्रीरामपाडा परिसर हा भौगोलिक दृष्टया अडचणीचा, दाट लोकवस्ती असलेला व डोंगराळ भागातील परिसर आहे.

सदर परिसरातील नागरिकांचा दैनंदिन निर्माण होणारा घरगुती कचरा सार्वजनिक कचरा संकलन केंद्र येथे जमा केला जातो. सदर कचरा स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत नियुक्त स्वयंसेवकांच्या मदतीने गोळा करून कचरा वाहतूक वाहनाद्वारे क्षेपणभूमी येथे स्थलांतरित केला जातो.

श्रीरामपाडा परिसरातील दैनंदिन निर्माण होणारा कचरा वेळच्यावेळी संकलित करून कचऱ्याचे ढिग जमा होऊ नये याबाबत दक्षता घेण्यात येते. तसेच परिसरामध्ये साफसफाईचा स्तर उंचवण्याकरिता नागरिकामध्ये वेळोवेळी जनजागृती करण्यात येते. सदर परिसरामध्ये कचऱ्याचे ढिग जमा होऊन कोणतीही घटना घडू नये याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे नगररस्ता वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याबाबत

(२२) २१५० (२४-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे नगर रस्त्यावर खराडी परिसरात भरधाव ट्रकच्या धडकेत दादासाहेब भगवान कुडक या दुचाकीस्वाराचे निधन झाल्याचे माहे डिसेंबर २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, पुणे नगर रस्तावर बीआरटी मुळे तसेच वाढलेल्या दळण-वळणामुळे वारंवार अपघात होत असल्याने अतिशय धोकादायक झाला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने सुरक्षित होण्यासाठी तसेच बीआरटी मार्ग काढण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे,

(२) अंशत: खरे आहे.

(३) पुणे नगर रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी व वाढलेल्या दळणवळणामुळे रस्ता वाहतुकीकरता धोकादायक झालेला आहे. ही बाब विचारात घेऊन पुणे महानगरपालिकेने नगर रस्त्यावरील येरवडा पर्णकुटी चौक ते विमान नगर सोमनाथ नगर चौकापर्यंत संपूर्ण बीआरटी मार्गिका यापूर्वीच काढलेली आहे. त्यापुढील सोमनाथ नगर चौक ते आपले घर दरम्यानची बीआरटी मार्गिका व बस स्थानके संपूर्णपणे काढण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. त्याप्रमाणे उपरोक्त उल्लेख केलेल्या दुसऱ्या टप्प्यातील बीआरटी मार्गिका काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

माहिम येथील उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासांची कामे प्रलंबित असल्याबाबत

(२३) २३६४ (०१-०५-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिम येथील उपकर प्राप्त इमारती मोठया प्रमाणावर असून येथे पुनर्विकासाची कामे मोठया प्रमाणात सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात काही विकासकांनी सदरील पुनर्विकासाचे काम अर्धवट सोडून दिले असल्याने रहिवाश्यांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्विकास प्रकल्प अर्धवट सोडून जाणा-या विकासकांवर तसेच पुनर्विकास प्रकल्प विहित कालावधी पूर्ण करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०८-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई शहरातील धोकादायक घोषीत उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास तसेच विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३ (६), ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत मालक / विकासकाने अर्धवट अवस्थेत सोडलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत म्हाड अधिनियम, १९७६ मधील कलम ९१ (अ) च्या सुधारणेनुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत दिनांक२२ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. सदर सुधारणेच्या अनुषंगाने धोकादायक घोषीत उपकरप्राप्त इमारती तसेच रखडलेले / अर्धवट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्पाबाबत म्हाडामार्फत आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे.

(४)प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या योजनेत औषधोपचार आणि आरोग्य विषयक उपकरणांच्या देयकाची थकबाकी असल्याबाबत

(२४) २३६७ (०१-०५-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मुंबई शहरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ही योजना सुरु केली असून सद्यःस्थिती औषधोपचार आणि आरोग्य विषयक उपकरणांची १२० कोटी रुपयांची देयके थकबाकीमुळे हे दवाखाने बंद होण्याच्या मार्गावर असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची थकबाकी केव्हापर्यंत देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, तसेच सदरील दवाखाने पुन्हा सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे २५० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरु करण्यात आले आहेत.

मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खात्यास औषध पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराव्दारे प्राप्त झालेल्या देयकांचे अधिदान करण्यात आलेले आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे औषधांचा पुरवठा सुरळीतपणे सुरु असून सर्व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरळीतपणे कार्यरत आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेचे जी साऊथ आणि जी नॉर्थ विभागातील उद्यानांनी झालेली दुरवस्था

(२५) २३७० (२४-०४-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेचे जी साऊथ आणि जी नॉर्थ विभागातील सर्व महानगरपालिकेच्या उद्यानांची दुरवस्था झाली असून या उद्यानांमध्ये अंमली पदार्थाचे सेवन करणा-यांची आणि गुन्हेगारांचे अड्डे बनल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना तसेच वृध्दांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार संबधित विभागाकडे तक्रार करुनही दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

जी/दक्षिण व जी/उत्तर विभागातील सर्व उद्याने सुस्थितीत आहेत व नियुक्त केलेल्या कंत्राटदारामार्फत सदर उद्यानांची देखभाल केली जाते.

(२) हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण व जी/उत्तर विभागातील उद्यानांमध्ये सुधारणा /सुशोभिकरण करण्याकरिता केलेल्या मागणीनुसार कामाच्या प्राधान्याप्रमाणे निधीच्या उपलब्धतेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कामे हाती घेण्यात येत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेचे जी दक्षिण आणि जी उत्तर विभागातील महानगरपालिकेच्या शाळेमध्ये पुरेसा शिक्षक वर्ग नसल्याबाबत

(२६) २३७२ (०१-०५-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या जी साऊथ आणि जी नॉर्थ विभागातील सर्व महानगरपालिकेच्या शाळेमध्ये विविध समस्या, पुरेशी शिक्षक नसल्याने शिक्षणाचा दर्जा सुधारलेला नसल्याचे नुकतीच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार संबधित विभागाकडे तक्रार करुनही दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी-उत्तर विभागातील काही शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त होती. तथापि, सद्यस्थितीत सदर रिक्त पदांवर शिक्षण सेवक, तासिका तत्वावरील शिक्षकांची नियुक्ती तसेच खाजगी विभागाकडून आलेल्या शिक्षकांचीही नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच, जी-दक्षिण विभागातील सर्व शाळांमध्ये पुरेसे शिक्षक उपलब्ध आहेत व शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षक कार्यरत आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

माहिम येथील नागरिकांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याबाबत

(२७) २३७३ (०१-०५-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिम येथील नागरिकांना माहे डिसेंबर,२०२४ वा त्या दरम्यान पासून सातत्याने कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,पाणी पुरवठा कमी दाबाने करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या भागात नियमित व योग्य दाबाने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) माहिम विधान सभा क्षेत्रातील, मिया मोहम्मद छोटाणी रोड, पीतांबर लेन येथील नागरिकांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता, लेडी जमशेदजी रोड व मिया मोहम्मद छोटाणी रोड येथील जंक्शन वरील २५० मि. मि. व्यासाच्या जल वाहिनीत गळती आढळून आली होती.

(३) उपरोक्त २५० मि.मि. व्यासाच्या जलवाहिनी दुरूस्ती करण्यात आलेली असून गळती बंद करण्यात आलेली आहे. गळती बंद केल्यानंतर मिया मोहम्मद छोटाणी रोड येथील इमारतींच्या पाणीपुरवठ्यात सुधारणा झाल्याचे दिसून आले. तसेच कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबत इतर कारणांचा शोध घेण्यात आला असून व त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्यात आलेल्या असून सद्यस्थितीत पाणीपुरवठ्यात सुधारणा होऊन पाणी पुरवठा सुरळीत होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील बेस्ट उपक्रमाला भाडे तत्वावर मिनी बसगाडया पुरविण्यासाठी कंत्राटदारांची नेमणूक रद्द करण्याबाबत

(२८) २३८६ (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट उपक्रमाला भाडे तत्वावर ३०० मिनी बसगाडया पुरविण्यासाठी ज्या कंत्राटदारांची नेमणूक केली होती त्या कंपनीचे कंत्राट रद्द करण्यात आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राट रदद होऊनही मुंबईतील अनेक ठिकाणी ,भाईदर वाशी तसेच कसारा, नाशिक मार्गावर बेस्टचे बोधचिन्ह असलेल्या बसगाडया अनधिकृतपणे चालविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये बेस्टच्या संबंधित अधिका-यांच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यासदंर्भात संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

बेस्ट उपक्रमास २८० मिनी बस गाड्या पुरविणारा कंत्राटदार हंसा सिटी बस सर्विसेस (मुंबई) प्रा.लि. याचे कंत्राट बेस्ट उपक्रमाकडून रद्द करण्यात आलेले नसून सदर कंत्राट कंत्राटदाराने विविध कारणे दाखवून स्वत:हून भाडे तत्वावरील बस सेवा दिनांक१०.१०.२०२४ पासून बंद केली आहे.

(२) बेस्ट उपक्रमातील भाडेतत्वावरील मिनी बसगाड्या सेवा कंत्राटदाराने स्वतःहून बंद केल्यानंतर, कंत्राटदाराने आपल्या ७ मिटर (मिनी) बसगाड्या बेस्ट आगारातून दुस-या ठिकाणी नेण्यास सुरूवात केली होती. एक बस अशाच प्रकारे मुंबई येथून नाशिक कडे नेत असताना बेस्ट उपक्रमाच्या लोगोसह छायाचित्र टिपण्यात आले होते. सदर बसमध्ये कोणीही प्रवाशी प्रवास करीत नव्हते.

(३) बेस्ट उपक्रमाकडून संबंधित कंत्राटदाराला सदर बसगाड्यांवरील बेस्ट उपक्रमाचे लोगो त्वरीत हटविण्या बाबत आदेश देण्यात आले व त्याप्रमाणे कंत्राटदाराने त्वरीत दखल घेऊन सर्व बसगाड्यांवरील 'बेस्ट लोगो' हटविले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वर्सोवा येथील न्यू लिंक रोड मार्गालगतच्या आरपीयू १.१ या मोकळा भूखंडावर आरक्षणाप्रमाणे फायरब्रिगेड स्टेशन उभारण्याबाबत

(२९) २४०४ (२४-०४-२०२५). श्री.हारुन खान (वर्सोवा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्सोवा विधानसभा क्षेत्रातील न्यू लिंक रोड, दत्ताजी साळवी मार्गालगत महानगरपालिकेच्या भूखंडावर आरपीयू १.१ व आरएमएस साठी दिनांक १.३.२०३४ पर्यंत आरक्षण असून आरपीयू १.१ या मोकळा भूखंडावर आरक्षणाप्रमाणे अग्निशमन (फायरब्रिगेड) स्टेशन व्हावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता, शहर नियोजन, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच आर.एम.एस.१.३ या भूखंडावर आरक्षणाप्रमाणे महानगरपालिकेचा दवाखाना किंवा कर संकलनाचे कार्यालय करण्याची मागणी स्थानिकांची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे. या बाबत मा. आमदार, श्री. हारून खान यांचे पत्र विकास नियोजन विभागास दिनांक १३.०१.२०२५ रोजी प्राप्त झाले.
(२) होय, हे खरे आहे. या बाबत मा. आमदार श्री. हरून खान यांनी दिनांक १३.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर बाबत स्थानिकांची मागणी असल्याबाबत कळविले आहे.
(३) विकास नियोजन- २०३४ नुसार, मौजे आंबिवली येथील न. भू. क्र. ६६३/१३ हा भूखंड अग्निशामक केंद्रासाठी (आर.पी. यू. १.१) व महानगरपालिका सुविधासाठी (आर.एम.एस. १.३) आरक्षित आहे. सदर भूखंडाचा धारणाधिकार 'ब-१' असून सदर जमीन भाडे पट्ट्यावर मेसर्स शाह ऍंड कन्सटट्रक्शन कंपनी लिमिटेड यांना देण्यात आलेली होती. सदर विकासक आरक्षित भूखंड उद्देषित हेतूसाठी विकास करण्यासाठी पुरेशी संधी दिल्यानंतरही विकसित करू न शकल्याने, सदर विकासकास दिलेली परवानगी रद्द करून, विषयांकित भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिनांक ०४.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भांडुप येथील नागरिकांना २४ तास पाणी पुरवठा करण्याबाबत

(३०) २४६२ (०१-०५-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील भांडुप पश्चिम मुंबई या विभागाचा झपाट्याने होणारा औद्योगिक विकास आणि वाढणारी लोकसंख्या या पार्श्वभूमीवर भांडुप परिक्षेत्रामध्ये फक्त तीन तास पाणी पुरवठा केला जातो हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भांडुप येथील नागरिकांना ३ तास पाणी पुरवठा केला जातो तर मुलुंड येथील नागरिकांना २४ तास पाणी पुरवठा केला जातो याबाबत महापालिकेने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, भांडुप येथील नागरिकांना २४ तास पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.
भांडुप (पश्चिम) येथे विविध विभागामध्ये नियमीत पाणी पुरवठ्याच्या समय सारणीनुसार ३ तास ते २४ तास इतक्या कालावधीत दैनंदिन गरजेनुसार पुरेसा पाणीपुरवठा केला जातो.
(२) बृहन्मुंबई महापालिकेच्या शहरातील दोन विभाग कार्यक्षेत्रामध्ये २४/७ पाणी पुरवठा करण्याची योजना प्रायोगिक तत्वावर हाती घेण्यात आली होती. ज्यामध्ये टी विभागातील मुलुंड हे कार्यक्षेत्र अंतर्भूत करण्यात आले होते. तथापि, असे निदर्शनास आले की मुंबई शहरातील उंच सखल भाग तसेच २४/७ पाणी पुरवठा करण्याकरिता अधिक प्रमाणात पाण्याची आवश्यकता असल्यामुळे व त्यासाठी आवश्यक पुरेसा साठा उपलब्ध नसल्यामुळे सदर योजना व्यवहार्य नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सदर योजना पुर्णपणे अंमलात आणता आली नाही. तथापि मुलूंड मधील पाणी पुरवठ्याच्या कालावधीमध्ये वाढ झाली असली तरी आवश्यकतेनुसारच पाणीपुरवठा केला जातो.
(३) सद्यस्थितीत धरण क्षेत्रातील उपलब्ध पाणीसाठा व मुंबई शहरातील दैनंदिन मागणी पाहता तसेच भांडुप (प.) विभाग भौगोलिकदृष्ट्या उंच-सखल व डोंगराळ भाग असल्यामुळे २४ तास पाणीपुरवठ्याबाबत कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई उपनगर येथील भांडुप पश्चिम जी. के. डब्ल्यू कंपनी ते भांडुप (पूर्व) दातार कॉलनीपर्यंत नवीन उड्डाणपूल बांधण्याबाबत

(३१) २४९५ (०१-०५-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील भांडुप पश्चिम जी. के. डब्ल्यू कंपनी ते भांडुप (पूर्व) दातार कॉलनीपर्यंत नवीन उड्डाणपूल बांधण्यासाठी शासनाकडून मंजूरी मिळालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ब्रीजचे काम सुरू करण्यात आले आहे काय, सदर काम अद्याप सुरू करण्यात आले नसल्यास कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर ब्रीजचे काम कधीपर्यंत सुरू करण्यात येणार असून तो किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, सदर पूलाचे बांधकाम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) भांडुप पूर्व-पश्चिम परिसराला वाहनां करिता कोणत्याही प्रकारचा रस्ता पूल नसल्या कारणाने दक्षिणेला जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड व उत्तरेला नाहूर उड्डाणपूल असून भांडुप परिसरातील नागरिकांना ५ कि.मी. वळसा घालून प्रवास करावा लागत असल्याने सदर उड्डाणपूल बांधण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रास्तविले आहे.
(२) सदर उड्डाणपुलाचे काम सुरु करण्यात आलेले आहे.
(३) सदर उड्डाणपुलाचे काम प्रगतीप्रथावर असून मार्च, २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

बुध्द कॉलनी ,कुर्ला (पश्चिम) मुंबई येथे मेट्रो रेल्वेचे काम अत्यंत धिम्म्या गतीने सुरु असल्याबाबत

(३२) २६५४ (०१-०५-२०२५). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातांक्रुझ चेंबुर लिंक रोड वर बुध्द कॉलनी, कुर्ला (पश्चिम) मुंबई येथे मेट्रो रेल्वेचे काम गेल्या अनेक दिवसांपासून अत्यंत धिम्म्या गतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी रस्त्यालगत पत्र्याचे बॅरीकेड्स लावल्यामुळे रस्ता अरुंद झाल्यामुळे पूर्व उपनगरातून पश्चिम उपनगराकडे जाण्यासाठी सांताक्रुझ-चेंबुर लिंक रोड हा अत्यंत उपयुक्त असलेल्या मार्गावर होत असलेली वाहतूकी कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले असून महाविदयालयीन विदयार्थी व अम्ब्युलन्स यांना फारच अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहतूक कोंडी सोडवण्याच्यादृष्टिने मेट्रो रेल्वेचे काम जलद गतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) बुध्द कॉलनी, कुर्ला (प.) येथे चालु असलेल्या स.गो. बर्वे मार्ग स्थानकासाठी उभारलेले बॅरीकेड्स पूर्णपणे रस्त्याच्या दुभाजकाच्या बाजुस स्थलांतरीत केले असून सदर ठिकाणी रस्ता वाहतुकीस मोकळा करण्यात आला आहे.

तसेच मेट्रो मार्ग-२ब ही मार्गिका सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यावर हलाव पुलास ओलांडत असून सदर क्षेत्र हे आंतराष्ट्रीय विमानतळाच्या फनेल झोन अंतर्गत येत असल्याकारणाने हलाव पुलावरील वापरायोग्य उंची ही ३.५ मी. प्राप्त होत आहे. सदर मर्यादित उंची मुळे गणेशोत्सवाच्या वेळी गणेशमुर्तींच्या पारंपरिक विसर्जन मार्गात अडथळा निर्माण होणार असल्याने सदर भागातील मेट्रोची स्थापत्य कामे सध्यस्थितीत थांबविण्यात आली आहेत. याविषयी प्राधिकरणातर्फे पर्यायी मार्ग ए.एच. वाडीया मार्गाचे विस्तारीकरण करण्यासाठी व पुन:श्च मेट्रोची स्थापत्य कामे लवकरात लवकर सुरु करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

कुर्ला,घाटकोपर आणि विद्याविहार येथील अनधिकृत फेरीवाल्यांबाबत

(३३) २९०० (०१-०५-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला, घाटकोपर पूर्व पश्चिम एल.बी.एस मार्ग, विद्याविहार पूर्व पश्चिम स्थानकाजवळ असलेल्या रस्त्यांवरील फुटपाथ फेरीवाल्यांसह लगतच्या दुकानदारांनी व्यापलेले असल्याने फुटपाथवर व्यवस्थित चालता येत नसल्याने नागरिकांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागत असल्याने तेथे वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्दीच्यावेळी माणसांसोबत वाहनांच्या गर्दीमुळे कुर्ल्यासारख्या दुर्घटनेची भीती व्यक्त होत आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घाटकोपर वेलकम हॉटेल ते विद्याविहारकडे जाणाऱ्या रस्त्यासोबत विद्याविहार पश्चिमेकडील तिकीट काउंटर लगत रस्त्यावर सर्वठिकाणी फेरीवाल्यंनी बस्तान मांडले आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित ठिकाणी फेरीवाले मुक्त करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) एल विभाग कुर्ला कार्यालयाच्या हद्दीतील कुर्ला - रेल्वे स्थानक पूर्व व पश्चिम लगत तसेच एल.बी.एस मार्ग येथील आणि एन विभाग हद्दीतील घाटकोपर पूर्व पश्चिम एल. बी. एस मार्ग आणि घाटकोपर वेलकम हॉटेल ते विद्याविहारकडे जाणा-या रस्त्यांच्या परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांच्या विरोधात पोलिस प्रशासनाच्या उपस्थितीत अतिक्रमण निष्कासनाची कारवाई बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नियमितपणे सुरू आहे.

सदर ठिकाणी अनधिकृत फेरीवाले बसणार नाहीत, याकरीता महानगरपालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांच्यामार्फत सकाळ व दुपार सत्रात वारंवार कारवाई व गस्त घालून नागरीकांच्या येण्याजाण्यासाठी असलेले पदपथ/ रस्ते मोकळे ठेवण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

करमाळा व इंदापूर तालुक्यातील नागरिकांच्या सोयीसाठी उजनी धरणातून गोयेगाव ते अगोती व पोमलवाडी ते चांडगाव दरम्यान पुल उभारण्याबाबत

(३४) ३४५८ (२८-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा तालुक्यातील गोयेगाव व पोमलवाडी येथून अनुक्रमे अगोती व चांडगाव तालुका इंदापूर येथे नियमित दळणवळण करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असून त्यांना उजनी जलाशयातून बोटीद्वारे प्रवास करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातून रस्ता मार्गे इंदापूर भागात जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात वेळ व इंधन लागत असल्यामुळे जलाशयाद्वारे प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन्ही तालुक्यातील नागरिकांच्या सोयीसाठी नागरिकांकडून गोयेगाव ते अगोती व पोमलवाडी ते चांडगाव या दरम्यान उजनी धरण जलाशयातून पुल उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे
(३) व (४) सदर कामे निधी, निकष व प्राधान्यक्रम नुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

पुण्यातील कॅन्टोन्मेंट हद्दीत राहणा-या अनेक दिव्यांगाना महानगरपालिकेच्या योजनापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

(३५) ३६०५ (०१-०५-२०२५). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील कॅन्टोन्मेंट हद्दीत राहणा-या अनेक दिव्यांगाना प्रशासकीय गैरप्रकारामुळे महापालिकेच्या अनेक योजनांपासून वंचित रहावे लागल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीनुसार दिव्यांगाना महानगरपालिकेच्या योजनेपासून लाभ मिळण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०२५) : (१) दिव्यांग कल्याणकारी योजनांचा लाभ देणेसाठी महापालिका सभा ठराव क्र.४१८, दिनांक१०/०८/२०१६, महापालिका सभा ठराव क्र.४०१, दिनांक२२/०९/२०२१ व महापालिका सभा ठराव क्र.१७८, दिनांक०४/१०/२०२४ नुसार पुणे महानगरपालिका हद्दीतीलच दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देणेत यावा असे धोरण निश्चित असल्याने कॅन्टोंन्मेंट मधील दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य होत नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पिंपरी-चिंचवड शहरात महानगरपालिका रुग्णालयात जळीत रुग्ण उपचार कक्ष (बर्न वॉर्ड) उपलब्ध करण्याबाबत

(३६) ३६३६ (०१-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उद्योगनगरीत कारखान्यांसह निवासी व व्यापारी भागात आगीच्या घटना वारंवार घडत असल्याने आगीत मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान होऊन आगीच्या दुर्घटनेत भाजलेल्या व्यक्तीला १५ मिनिटांच्या आत उपचार न मिळाल्याने भाजलेल्या रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आगीच्या घटनांमधील जखमीं रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना उपचारासाठी पुण्यातील ससून रुग्णालयामध्ये जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तसेच उद्योग नगरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील तळवडे येथे दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजी वा त्या सुमारास स्पार्कल फायर कॅन्डल कारखान्याला लागलेल्या आगीत १४ कामगारांचा मृत्यू झाल्यानंतर महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये भाजलेल्यावर उपचार करण्यासाठी आवश्यक सुविधा नसल्याने महानगरपालिका प्रशासनाने बर्न वॉर्ड उभारण्याची घोषणा करून ५० कोटी रुपयांची तरतूद केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही अद्यापही उद्योगनगरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बन वॉर्ड नसल्याने भाजलेल्या रुग्णांची हेळसांड होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, चिंचवड येथील जुने तालेरा रुग्णालयातील नियोजित असलेल्या जळीत रुग्ण उपचार कक्ष बर्न वॉर्डपूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०२५) : (१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील तळवडे भागामध्ये व्यापारी भागात आगीची दुर्घटना होऊन १४ नागरिकांचा मृत्यू झाला होता.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने बर्नवॉर्ड उभारण्याची घोषणा केली आहे. त्याची कार्यवाही लवकरच करण्यात येणार आहे.
(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका रुग्णालयात बर्न वॉर्ड नसल्याने भाजलेल्या रुग्णांना ससुन रुग्णालयात दाखल व्हावे लागते.
(५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये जुन्या तालेरा रुग्णालयामध्ये बर्न वॉर्ड तयार करण्यासाठी कार्यवाही प्रस्तावित आहे. त्याकरीता कन्सल्टंट नेमणूक करण्यात आलेली असून या कामी नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच जुने तालेरा रुग्णालय नविन तालेरा रुग्णालयात स्थलांतरीत करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. जुन्या तालेरा रुग्णालयात बर्न वॉर्ड सुरु करण्याकरिता स्थापत्य व विद्युत विभागामार्फत निविदा प्रक्रिया प्रसिद्ध करण्याचे कामकाज प्रस्तावित आहे. त्यानंतर लवकरच जुन्या तालेरा रुग्णालयात बर्न वॉर्ड सुरु करण्यात येणार आहे.

पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत

(३७) ४१३३ (२३-०४-२०२५). श्री.हेमंत रासने (कसबापेठ) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या वसाहतीची दुरवस्था झाली असून कसबा येथील एकूण इमारतीची संख्या ४४ असून यामध्ये पूरग्रस्त बैठी चाळी ४, असणे, पुणे शहरात ७८ चाळी व इमारती बैठी घरे असून बैठी घरे वसाहती १० आहेत. एकूण सदनिका ३४५९ असून यामध्ये नादुरुस्त सदनिका ची संख्या १८७ आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार प्रशासनाकडे मागणी वा निवेदन देऊनही अद्यापही कोणताच निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन चौकशी करुन नादुरुस्त सदनिका दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) या ठिकाणच्या नागरिकांच्या प्राप्त तक्रारी अर्जानुसार या वसाहतींची वेळोवेळी दुरुस्ती करण्याची दक्षता पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत घेण्यात येत आहे.
(३) पुणे महानगरपालिकेच्या प्रत्येक वर्षाच्या अंदाज पत्रकात यासाठी तरतूद करण्यात येत असते. उपलब्ध तरतूद विचार घेऊन पुणे महानगरपालिकेच्या वसाहतीची दैनंदिन दुरुस्तीची कामे महापालिकेमार्फत करण्यात येत आहेत. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये RE२२B१०५ (पुणे मनपाच्या असलेल्या वसाहती मध्ये विविध दुरुस्ती करणे) या अर्थसंकल्पीय शिर्षकाखाली रक्कम रुपये २ कोटी एवढी तरतूद पुणे महानगरपालिकेने उपलब्ध केली होती. या अर्थसंकल्पीय तरतुदी पैकी अंदाजे रक्कम रुपये १४३.८० लक्ष कसबा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील वसाहतींची देखभाल दुरुस्तीसाठी खर्च झाले आहेत. तसेच सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये RE२२B१०५ (पुणे मनपाच्या असलेल्या वसाहती मध्ये विविध दुरुस्ती करणे) या अंतर्गत अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली रक्कम रुपये ३ कोटी एवढी तरतूद पुणे महानगरपालिकेने उपलब्ध केली असून यामधून सदर वसाहतीचे पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कौशल्य विकासासाठी विविध योजना व उपक्रम राबविण्याबाबत

(३८) ४३३३ (२८-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कौशल्य विकासासाठी २३०० कोटी रुपये खर्च करुन विविध योजना व उपक्रम राबविले जाणार असून त्याकरिता जागतिक बँकेशी करार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त करारानुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमधून ५० हजार युवक-युवतींना प्रशिक्षण दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह नागपूर, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र इंटरनॅशनल केंद्र कार्यरत होणार असून कौशल्य विकास विभाग व उच्च तंत्रशिक्षण विभाग नोकरी देणाऱ्या संस्थाबाबत सर्वसमावेशक असा एकत्रित कायदा करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. मंगलप्रभात लोढा (१७-०६-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत जागतिक बँक सहाय्यित मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (Development of Applied Knowledge and Skills for Human Development (DAKSH)) प्रकल्प राबविण्यास दिनांक१८.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाची किंमत रुपये २३०७ कोटी आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून मॉडेल ITI's तयार करणे, जागतिक कौशल्य केंद्राची निर्मिती, डाटा सेंटरची निर्मिती, विभागांतर्गत कार्यालयांचे बळकटीकरण व अद्ययावतीकरण तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचेच उद्योग केंद्रित कालसुसंगत कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करणे आणि उद्योजकता विकास कार्यक्रम राबविणे यांसारख्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहे. दक्ष प्रकल्पासंदर्भात दिनांक २७.१२.२०२४ रोजी करार झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील युवा वर्गास त्यांच्या शिक्षणानंतर कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता दिनांक ०९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्यपुरस्कृत मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्राचे रहिवाशी असलेल्या १८ ते ३५ वयोगटातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनां मध्ये ११ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच इयत्ता बारावी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थीना प्रतिमाह रु.६,०००/-, आय.टी.आय./पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थीना प्रतिमाह रु.८,०००/- व पदवी/पदव्युत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थीना प्रतिमाह रु.१०,०००/-इतके विद्यावेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर योजना दक्ष प्रकल्प अंतर्गत येत नाही.

(३) दक्ष प्रकल्पांतर्गत मुंबईसह नागपूर, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर येथे उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) कार्यरत करण्याचे प्रस्तावित आहे. यासंदर्भात उच्च तंत्रशिक्षण विभाग नोकरी देणाऱ्या संस्थाबाबत सर्वसमावेशक असा एकत्रित कायदा करण्याचे विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवापूर (जि.नागपूर) येथे धान खरेदीसाठी ऑन लाईन नोंदणी प्रक्रियेची मुदत संपल्याने शेतकरी धान खरेदीपासून वंचित राहिल्याबाबत

(३९) ५५१७ (२८-०४-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवापूर (जि.नागपूर) तालुक्यात शासनाच्या फेडरेशन शासकीय धान खरेदीसाठी ऑन लाईन नोंदणी प्रकिया राबविण्यात आल्या असून त्यात १,२६४ शेतक-यांनी नोंदणी केली, परंतु मुदत संपल्याने सुमारे २०० शेतकरी ऑन लाईन धान खरेदीपासून वंचित राहिल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान खरेदीपासून वंचित राहिलेल्या शेतक-यांचे धान खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. छगन भुजबळ (१५-०९-२०२५) : (१) हे अंशता: खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये धान खरेदी करण्याकरीता दिलेल्या विहीत मुदतीत १२६४ शेतकरी नोंदणी करण्यात आलेली आहे. शेतकरी नोंदणीसाठी दिलेली मुदत दिनांक ३१ जानेवारी, २०२५ अखेर संपल्याने २०० शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी पूर्ण करता आली नाही. सबब, रबी पणन हंगाम २०२४-२५ मध्ये सदर शेतकऱ्यांची नोंदणी करण्याची सूचना पणन महासंघास देण्यात आली आहे.

(२ खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये ऑनलाईन नोंदणी करण्यापासुन वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी. रबी पणन हंगाम २०२४-२५ मध्ये करण्याची सूचना पणन महासंघास देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

नांदेड शहरातील चौफाळा भागातील नागरी समस्यांबाबत

(४०) ५५४६ (०१-०५-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील चौफाळा भागातील रस्त्याची दुरवस्था, पथदिव्यांची विस्कळीत व्यवस्थापन, स्मशानभूमीची दुरवस्था, वाढती अस्वच्छता अशा अनेक समस्यांमुळे नागरिकांनमध्ये अंसतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरिकांनी वारंवार महानगरपालिका प्रशासनाकडे तक्रारी करूनही त्याकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून शहरातील चौफाळा भागातील नागरी सुविधाबाबत असलेल्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

नांदेड शहरातील चौफळा भागातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बिलाल नगर चौक पर्यंत मुख्य रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच उर्वरीत रस्ते सुव्यवस्थीत आहेत. लोकशाहीर आणाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत चौफाळा भागातील तारातीर्थ घाटाच्या सुशोभिकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

चौफाळा भागातील बंद असलेले पथदिव्याबाबत सामान्य नागरिकांची तक्रार प्राप्त होताच (४८) तासाच्या आत पथदिवे महानगरपालिकेकडून दुरुस्त करुन चालू देण्यात येतात.

चौफाळा भागातल स्वच्छतेचे काम नियमित करण्यात येत असून सदर भागात स्वच्छता राहील याची खबरदारी महानगरपालिकेकडून घेण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नांदेड शहरातील चौफाळा भागातील नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बिलाल नगर चौक पर्यंत मुख्य रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत चौफाळा भागातील तारातीर्थ घाटाच्या सुशोभिकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

चौफाळा भागातल स्वच्छतेचे काम नियमित करण्यात येत असून सदर भागात स्वच्छता राहील याची खबरदारी महानगरपालिकेकडून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासनाने झोन क्र.६
हडको भागात नागरी सुविधा नसल्याबाबत

(४१) ५५४८ (०१-०५-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासनाने झोन क्र.६ हडको भागातील विठ्ठलराजनगर, कथकनगर, चेतकनगर या भागात मागील २० वर्षापासून रस्ते, नाली, ड्रेनेज आदि नागरी सुविधा पुरविलेल्या नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागात नागरीसुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी वारंवार स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते यांचेकडून लेखी निवेदनाद्वारे महापालिका आयुक्तांकडे करण्यात येऊनही त्याकडे महानगरपालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागात तात्काळ नागरीसुविधा पुरविण्यात न आल्यास दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी कचरा फेको आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी महानगरपालिका प्रशासनाला माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून उक्त विभागात नागरसुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०५-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडून झोन क्र . ६ सिडको भागामध्ये ड्रेनेज लाईन नसल्याने सदर जागेचे सर्वेक्षण करुन केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० या योजनेअंतर्गत नविन ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम करण्यात येत आहे.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत कंथकनगर भागात सिमेंट रस्त्याचे कांही कामे झालेले आहेत. तसेच विठ्ठलराजनगर व चेतकनगर या भागातील इतर सोयी सुविधा करणेसाठी सदर योजनेअंतर्गत व जिल्हा नियोजन मंडळ (DPDC) अंतर्गत सविस्तर प्रस्ताव पाठवून निधी उपलब्धतेनुसार काम महानगरपालिकेकडून हाती घेण्यात येतील. तसेच वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत रस्त्यावर चुरी मुरुम टाकून वेळोवेळी महानगरपालिकेकडून दुरुस्ती करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

नागरिकांच्या मागणीनुसार आवश्यक नागरी सुविधा महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) हे अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवडयात महानगरपालिकेस निवेदन प्राप्त झालेले असून त्याअनुंषंगाने नागरिकांच्या भेटी घेऊन आंदोलन मागे घेण्याबाबत संबंधितांना दिनांक४.२.२०२५ च्या पत्रान्वये कळविले असून, त्यानुसार उपोषण स्थगीत करण्यात आले आहे.

(४) केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० या योजनेअंतर्गत कंथकनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे व मलशुध्दीकरण केंद्राचे काम

मंजुर करुन घेतले असून जागेवर काम सुरु करण्यात येत आहे.

उर्वरित सदर भागाचे सर्वेक्षण करुन लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी उपलब्धतेनुसार महानगरपालिकेकडून काम हाती घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अग्रिशमन यंत्रणा बसविण्यासाठी अग्रिशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेतल्याबाबत

(४२) ५८५८ (०१-०५-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मॉल्स, शॉपिंग सेंटर, हॉस्पिटल्स, शाळा- महाविद्यालयात अग्निशम यंत्रणा बसवून अग्रिशन विभागाकडून ना-हरकत (एनओसी) प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असतांनाही अद्यापर्यंत ३० हजारापेक्षा अधिक इमारती मध्ये अग्निशमन यंत्रण नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच व्यावसायिक सर्व आस्थापनांना अग्निशमन विभागाकडून ना-हरकत (एनओसी) प्रमाणपत्र बंधनकारक असून नुतनीकरण करणे गरजे असतांनाही केवळ ६६१ जणांनी परवानगी घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार अग्रिशमन यंत्रण न बसविण्यात आलेल्या व्यावसायिक व आस्थापनांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२५) : (१) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर शहरात सन २००० पासून जानेवारी, २०२५ महानगरपालिका नगररचना विभागाकडून सुमारे २७,१९२ इमारतींना बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

२४ मीटर पेक्षा खालील निवासी इमारतीनां महानगरपालिका ठरावानुसार अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची गरज नाही.

अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्रासाठी सन १९९९ पासून ते जानेवारी, २०२५ पर्यंत एकुण ३९१४ अर्ज प्राप्त झाले असून २८२२ प्रोव्हिजनल नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच एकुण १०५४ व्यवसायधारकांनी अग्निशमन उपकरणाची पुर्तता केल्यानंतर अंतीम नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महानगरपालिकेने कळविल्याप्रमाणे महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन ॲण्ड लाईफ सेफ्टी मेंजर्स ॲक्ट, २००६ व महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या दिनांक ३० ऑक्टोबर २०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार यानुसार अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र नुतनीकरण करण्याचे वंधनकारक नाही. सन २०२३-२४ या वर्षात विविध व्यवसायधारकांनी ७१० अर्ज सादर केले असून यापैकी ६६१ व्यवसायधारकांनी प्रोव्हिजनल नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(३) अग्निशमन यंत्रणा न बसविण्यात आलेल्या व्यावसायिक व आस्थापनांना नोटीस दिलेल्या असून महानगरपपालिकेमार्फत कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

लेबर कॉलनी- विश्वासनगर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथ नविन जिल्हाधिकारी संकुल उभारणे बाबत

(४३) ५८६७ (०१-०५-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लेबर कॉलनी- विश्वासनगर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील सुमारे २० एकर क्षेत्रावर नविन जिल्हाधिकारी संकुल उभारण्याकरिता निविदा मंजूर होऊन कार्यादेश देण्यात येऊनही अद्यापही या प्रकल्पाच्या कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामास सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पाच्या कामास सुरुवात करुन पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (११-०९-२०२५) : (१) व (२), हे खरे नाही.

इमारतीच्या बांधकामास सुरूवात झाली आहे. संकुल बांधकामासाठी लागणाऱ्या विविध परवानग्या मिळविण्याकरिता विलंब लागण्याने बांधकामास विलंब झाला असून, मुख्य इमारतीचे RCC संकल्पचित्राच्या मंजूरीची प्रक्रिया सुरू आहे. कामाचे वावातील आवारभिंतीचे काम व बांधकामा संबंधीत अनुषंगिक कामे कार्यस्थळी प्रगतित आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

इंडिया ग्लोबल फोरम कार्यक्रमामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील विकासासाठी सामंजस्य करार झाला असल्याबाबत

(४४) ७७५५ (१७-०६-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-कुर्ला संकुलातील जीओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित इंडिया ग्लोबल फोरम २०२५ या कार्यक्रमामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकासासाठी एकूण ४ लाख ७ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारात कोणकोणत्या अटी आहेत,

(३) असल्यास, या कायदयांतर्गत कोणकोणत्या प्रकल्पांची कामे करण्यात येणार असून करारांमुळे किती रोजगार उपलब्ध होणार आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरहू करार प्रामुख्याने मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वित्त पुरवठा करण्याकरिता करण्यात आले आहेत

सदर करार हे सामजस्य करार असून कायदेशीर अबंधनकारक आहेत.

अंतिम कर्ज मंजूरी संबंधित प्रकल्पांची व्यवहार्यता व सखोल मुल्यमापन करण्याच्या अधिन राहुन प्रकल्प निहाय कर्ज मंजूरी करण्यात येणार आहे.

करारानुसार ठराविक मर्यादेपर्यंत कर्ज घेण्यास मंजूरी आहे. तसेच कर्ज घेताना व्याज दराबाबत स्पर्धात्मक बोलीनुसार कर्ज घेण्यात येणार आहे.

(३) या करारांमुळे मेट्रो, रस्ते, पूल, नागरी सुविधा इत्यादी पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या अंमलबजावणीला वेग येणार आहे. मुंबई महानगर क्षेत्राला जागतिक आर्थिक केंद्र बनविण्यात मदत होणार आहे. तसेच, वाहतुक, कनेक्टीव्हिटी व नागरी सुविधा यामध्ये लक्षणीय सुधारणा होणार आहे. त्यामुळे मुंबई महानगर क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहेत.

मंत्रालयातील उपहारगृहात रॅम्पची सुविधा नसल्याने दिव्यांग नागरिकांना उपहारगृहात जाता येत नसल्याबाबत

(४५) ८६०० (२५-०८-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे प्रशासकीय केंद्र असलेला मंत्रालयात विविध कामानिमित राज्यभरातून नागरिक येत असतात त्यामध्ये दिव्यांग बांधवांची संख्याही लक्षणीय असून या सर्व नागरिकांच्या जेवण आणि नाश्त्याच्या सोयीसाठी प्रशासनाकडून मंत्रालयात दोन उपाहारगृहांची व्यवस्था असून या पोट मजल्यांवर जाण्यासाठी रॅम्पची सुविधा नसल्याने दिव्यांग नागरिकांना या उपहारगृहात जाता येत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरकारच्या सल्लागार मंडळाच्या बैठकीतही हा विषय मांडला असता अधिकाऱ्यांकडून उत्तरे मिळत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मंत्रालयात येणाऱ्या दिव्यांगांची होणारी गैरसोय लक्षात घेता त्यांना उपहारगृहात जाण्यासाठी प्रशासनाकडून तातडीने रॅम्पची सुविधा निर्माण करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मंत्रालयातील उपहारगृहामध्ये येणाऱ्या दिव्यांग बांधवांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन, तळमजल्यावर दिव्यांग बांधवांकरिता अंतर्गत सुविधासह पर्यायी उपहारगृह उपलब्ध करून देण्यात येत आहे.

धानाला जाहीर करण्यात आलेला प्रोत्साहनपर बोनस मिळाला नसल्याबाबत

(४६) ८६७२ (०८-०७-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक अडचणीत असलेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी किमान आधारभूत खरेदी योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम सन २०२४-२५ मध्ये नोंदणीकृत शेतकऱ्यांना धान उत्पादनाकरिता त्यांच्या धान लागवडीखालील जमीन धारणेनुसार प्रती हेक्टरी रू.२० हजार याप्रमाणे २ हेक्टरच्या मर्यादेत प्रोत्साहनपर बोनस देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णयानुसार राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना सहा माहिने होऊन सन २०२५ खरीप हंगामाच्या मशागत व लागवडीला सुरुवात होऊनही प्रोत्साहनपर बोनस मिळालेला नसल्याने शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या तयारीवर आणि आर्थिक नियोजनावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रोत्साहनपर बोनस धान उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (२०-०८-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.
(३) दिनांक २३ जुलै, २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळ या अभिकर्ता संस्थानमार्फत एकुण ३,२४,०२७ शेतकऱ्यांना रु. ७२७.०४ कोटी प्रोत्साहनपर राशीची रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरीत शेतकऱ्यांची रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड येथील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु असलेल्या कामांची दक्षता व गुणनियंत्रण मंडळाद्वारे तपासणी होण्याबाबत

(४७) १०६६८ (२५-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधलेले व्हीव्हीआयपी विश्रामगृह, वसतीगृह, आयटी आय संरक्षक भिंत, पुलांचे बांधकाम, रस्त्यांचे बांधकाम, नालीचे बांधकाम तसेच इतर झालेल्या कामांचा दर्जा अंदाजपत्रकानुसार झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बाबतीत संबंधित ग्रामस्थांच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन नियमानुसार केलेल्या सर्व कामांची योग्य ती तपासणी करण्यात यावी व त्यानुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास संबंधित सचिव बांधकाम व रस्ते विभाग मंत्रालय, मुंबई व दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, बांधकाम भवन, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) अभिलेख्यात आढळून येत नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) चौकशीची कार्यवाही प्रगतित आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्य शासनाने केंद्रीय वित्त आयोगाकडे राज्याच्या विकासकामांसाठी निधीची केलेली मागणीबाबत

(४८) १०७३३ (०९-०७-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारने निवडणूक प्रचार काळात जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आणि विविध लोककल्याणकारी योजना राबवण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य सरकारने केंद्रीय वित्त आयोगाकडे राज्याचा कारभार चालवण्यासाठी विशेष आर्थिक पॅकेजची १ लाख २८ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य सरकारच्या विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांसह विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यासाठी आणि राज्याच्या विकासकामांसाठी पुरेसा निधी नसल्याने अनेक योजना आणि कामे प्रलंबित असून याला आर्थिक नियोजनाचा

अभाव आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य सरकारने वित्त आयोगाकडे १ लाख २८ हजार कोटी रुपयांच्या मागणी पुर्ण करण्यात आल्यावर सरकारकडून या निधीचा वापर कोणत्या प्राधान्यक्रमाने करण्यात येईल,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. अजित पवार (१७-०९-२०२५) : (१) हे खरे नाही
(२) हे खरे नाही.
केंद्रीय वित्त आयोगास प्रत्येक राज्य सरकारकडून मेमोरंडम सादर करण्यात येते. राज्य सरकारने १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाकडे मेमोरंडमद्वारे एकूण रु.१.२८ लाख कोटीच्या विशेष अनुदानाची मागणी केली असून त्यामध्ये मुंबई महानगर प्रदेशाचा आर्थिक विकास आराखडा, आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्प, नवी मुंबई संकुलाचे बांधकाम, तुरुंगातील पायाभूत सुविधा मजबूत करणे, पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, इको-टुरिझम या कामांचा समावेश आहे.
(३) हे खरे नाही.
(४) उप प्रश्न (२) च्या उत्तरामध्ये नमूद केलेल्या कामांसाठीच या निधीचा वापर करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

आदिवासी विकास महामंडळाच्या सुरगाणा येथील गोदामातला भात कंत्राटदाराने नाशिक येथे घेऊन न जाता थेट गुजरात येथे चढ्या भावाने विक्री केल्याबाबत

(४९) १२४९७ (१८-०८-२०२५). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळाच्या सुरगाणा येथील गोदामातला भात कंत्राटदाराने नाशिक येथे घेऊन न जाता थेट गुजरात येथे चढ्या भावाने विक्री करुन काळाबाजार केल्याने चौकशी करण्यासाठी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी चार सदस्यीय समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात उक्त समितीची चौकशी पूर्ण करुन सदर अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१५-०९-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे.
दिनांक ०२ मे, २०२५ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमिच्या अनुषंगाने आदिवासी विकास महामंडळाने दिनांक २ मे, २०२५ रोजी चौकशी पथकाची नियुक्ती केली. सदर चौकशी पथकाने चौकशी पूर्ण करुन दिनांक १९ मे, २०२५ रोजी प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला.
(३) व (४) आदिवासी विकास महामंडळाकडुन संबंधित मिलर्सची बँक गँरटी रक्कम रु. २ कोटी १० लक्ष जप्त करण्यात आली आहे. अध्यक्ष जिल्हा धान भरडाई समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून पणन हंगाम २०२४-२५ करीताचा करारनामा रद्द करण्यात आला आहे.

करमाळा विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्याबाबत

(५०) १२९४७ (०९-०७-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, करमाळा विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्यासाठी मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम मा. मंत्री यांचेकडे दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (११-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी निधी उपलब्धता विचारात घेता अग्रक्रम,निकष व शासनाचे धोरण विचारात घेऊन, योग्य कार्यवाही करण्यात येईल.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.